## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.४

विषय क्रमांक - १ दिनांक २२/८ /२००६

ठराव क्रमांक - १ दिनांक २२/८/२००६

**प्रस्तावाचा विषय** :- मा. स्थायी समिती दिनांक १५/७/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मागील सभा दिनांक १५/७/२००६ रोजीच्या झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी मा. स्थायी समिती पुढे ठेविले.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा श्री चव्हाण दि.ना.- मागील सभेचे प्रोसिडींग वाचून दाखववे. त्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा दि.१५/७/२००६ रोजीचे सभेमध्ये पारित झालेले प्रस्तावाचे विषय आणि ठराव वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- मागील सभे मध्ये दलित वस्ती मधील कामां बाबत नेमलेल्या कमेटीने दिलेल्या अहवालास विरोध नोंदविला होता त्यात ज्या वॉर्डा मध्ये कामे झाली नाहीत तेथे कामे करावीत तसेच ज्या वॉर्डा मध्ये अगोदरच बरीच कामे झाली आहेत तेथे पुन्हा कामे करू नयेत असे माझे म्हणणे होते.

मा श्री चव्हाण दि.ना.- प्रभाग क्रमांक १३ मधील संडास बांधणेच्या प्रकरणात टि.पी (टाउन प्लॅनर) यांचा अभिप्राय घेतलेला नाही आपण दहा दहा लाखाची कामे करतो आहोत. पुढे काही अडचणी निर्माण होवू नये. म्हणून सदरचे जागे बाबत माहिती घेवून पुढील कारवाई करावी बससेवा अजून सुरू झालेली नाही.

मा.सभापती साहेब - बस सेवेस ना हरकत दाखला मिळाला नाही त्या मुळे अजून बस सेवेची कारवाई पूर्ण झालेली नाही.

मा श्री चव्हाण दि.ना.- बससेवेस ना हकरत दाखला मिळाला अशी बातमी पेपरला आली होती ती खोटी आहे का ?

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- एस.टी.महामंडळाने ही नुकसान भरपाई मागितली अशीही बातमी आली होती.

मा.सभापती साहेब - वृत्तपत्रातील बातम्या व प्रशासन या मध्ये फरक आहे.

मा श्री चव्हाण दि.ना.- बातम्या निदर्शनास आणून देणे आमचे कर्तव्य आहे. जनतेच्या भावनेशी खेळू नका कामासाठी कुणाला प्रसिध्दी हवी आहे. आपण सभेत चर्चा करतो. विषयास मंजूरी दिली जाते वर्तमान पत्रात अशा बातम्या येतात नागरिक विचारणा करतात बससेवा मात्र चालू होत नाही.

मा.श्री चोपडा सं.फु.- पेपरला बातम्या येतात बस सेवा लवकर चालू होईल असे वाटते पण प्रगती होत नाही.

मा.श्री जोशी अ.सु.- सदर बस सेवा प्रकरणी प्रशासनासह सर्वच उदासीन आहेत.

मा.सभापती साहेब - इंजिनिअर श्री निकम यांनी बससेवा प्रकरणी माहिती द्यावी.

मॅके.इंजिनिअर श्री निकमः-अहमदनगर बससेवेस ना हरकत दाखला मिळणेसाठी मा.शासनाकडे प्रकरण पाठविले समक्ष चर्चा ही केली मंत्रालया मध्ये मा.मंत्री महोदय श्री अत्राम साहेब यांनी काही अटीवर परवानगी मिळेल असे सांगितले परंतु ना हकरकत प्रमाणपत्र मिळाले नाही. तेव्हाच एस.टी. महामंडळाने एस टी तोटयात असल्याने बस सेवा तोटयात चालविल्याने त्याची नुकसान भरपाई मागितली आम्ही ती मंजूर नसल्याचे व बस सेवेचे नुकसान भरपाईशी मनपाचा संबध नाही असे सांगितले मा.जिल्हाधिकारी साहेबा समवेतचे मिटींग मध्ये जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या ठरावानुसार नाहरकत प्रमाण पत्र मिळाले असून परवान्या बाबतचा प्रस्ताव नाशिक परिवहन प्राधिकरण यांचे कडे पाठविलेला आहे. तो मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

मा.श्री जोशी अ.सु.- परवानगी मिळाली अशी बातमी पेपरला आली होती

मा.सभापती साहेब - प्रशासनाने बातम्या दिलेल्या नाहीत वार्ताहाराने दिलेल्या आहेत.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- साठ दिवसाची मुदतवाढ देतांना तीस दिवसाची मुदतवाढ द्यावी अशी चर्चा केली होती.स्वताः परवानगी आणून बससेवा सुरू करणारे ठेकेदार आपले येथे आहेत.

मा.सभापती साहेब - बस सेवेस दिलेली मुदत संपण्यापूर्वी प्रशासनाने सभेपुढे रिपोर्ट ठेवावा तेव्हा निर्णय घेवू.

मा.श्री त्रिपाठी सु.च.- सहा रस्त्याची कामे लवकर होणे साठी त्याच्या निविदा वेगवेगळया काढव्यात असे आम्ही म्हटले होते. तसेच निविदा मंजूरीचे वेळी आम्ही दिलेल्या पत्रामध्ये मा.आयुक्त साहेब मा.उपायुक्त साहेब यांनी सदर प्रकरणी नियमानुसार कारवाई करावी असे म्हटले होते.

मा.श्री जोशी अ.सु.-मागील सभेचे कार्यवृत्त कायम करतो आहोत त्यास कुणाला विरोध नोंदवायचा किंवा कसे ?

मा.सभापती साहेब - मागील सभा दि.१५/७/२००६ रोजीचे सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करावे.

**ठराव** - मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/७/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक - मा.श्री जोशी अ.सु.
अनुमोदक - मा.श्री गंधे मि.स.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

मा.स्थायी समिती सभा क्र.४

विषय क्रमांक - २ दिनांक २२/८ /२००६

ठराव क्रमांक - २ दिनांक २२/८/२००६

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर महानगरपालिका हद्यी मध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली साठी दिनांक १/१०/२००६ ते दि.३१/३/२००७ या सहा महिन्यांचे कालावधी साठी जकात ठेक्याची किमान देकार रक्कम रू. २०,५८,२६,११२/- निश्चीत करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** - विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेने दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ या एक वर्षाचे कालावधीसाठी मे.श्री.साई एन्टरप्रायजेस यांची जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता म्हणून नेमणूक केलेली आहे.सदरचा करार दिनांक ३०/९/२००६ रोजी संपुष्टात येत आहे.

मे.श्री.साई एन्टरप्रायजेस,उल्हासनगर यांनी वरील एक वर्षाचे कालावधीसाठी एकूण रक्कम रुपये ४० कोटी ४१ लाख एवढया रकमेस जकातीचा ठेका घेतलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने जकात वसुली सुरु केल्याने व अन्य महानगरपालिकेच्या तुलनेत काही वस्तूवरील जकातीचे दर हे जादा असल्याने तसेच जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक केल्याने शहरातील व्यापारी बंधू यांनी माहे डिसेंबर व नोव्हेंबर २००५ मध्ये शहरातील व्यापार व बाजारपेठ बंद ठेवली.याबाबत मा.शासनाच्या स्तरावर तसेच मा.वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री,अहमदनगर जिल्हा आणि मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग यांचेसमोर वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये महानगरपालिकेने जकातीसंदर्भात उचीत ठोस पावले उचलण्याबाबत निर्देश देण्यात आले.

त्यानुसार महानगरपालिकेने अभ्यास समिती गठीत करुन अभ्यास समितीच्या अहवालानुसार मा.स्थायी समिती व महासभेसमोर निर्णय घेवून दिनांक २०/२/२००६ च्या अंदाजपत्रकासोबत दर सुधारणेच्या नियमांना मंजुरी देण्यात आली.या मंजूर नियमांना मा.शासनाचे शासन निर्णय क्रमांक अमपा १००६/३३२/ प्र.क्र.११२/ /२००६ नवि -- २४ दिनांक २०/४/२००६ अन्वये मा.शासनाने मान्यता दिली.

सदरील नविन सुधारीत जकातीचे दर जकातीच्या ठेक्याचे कालावधीत लागू करावयाचे झाल्यास त्याबाबतचा सहमतीचा प्रस्ताव दिनांक ३१/०५/०६ रोजीचे महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यात आला.मा.महानगरपालिका सभा ठराव क्रमांक १ दिनांक ३१/५/२००६ अन्वये नविन सुधारीत जकात कर दिनांक १/६/०६ पासून लागू करणेस व नविन सुधारीत जकात दराचे अंमलबजावणीमुळे येणारी जकातीची तुटीची रक्कम रुपये १,५५,४९,०६५/- एवढी कमी करणेस तसेच दुध व भाजीपाल्यावरील जकात माफीमुळे येणारी तुटीची रक्कम वजा करणेस मान्यता देण्यात आली.व त्याप्रमाणे मे.श्री.साई एन्टरप्रायजेस यांचेशी सहमतीचा करार करणेत आला.

वरील ठरावानुसार सहमतीच्या कराराचे अनुषंगाने एकूण वार्षीक ठेक्याची रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करणेत आली.

| | | |
|---|---|---|
| अ | एकूण वार्षीक ठेक्याची रक्कम | ४०,४१,००,०००/- |
| ब | ४ महिन्यातील जकात दर कमी केल्यामुळे जकात रकमेत येणारी तुटीची रक्कम | १,५५,४९,०६५/- |
| क | दुध व भाजीपाल्यावरील जकात माफीमुळे येणारी तुटीची रक्कम | ८१,९०,०००/- |
| ड | एकूण वार्षीक तुटीची रक्कम (ब + क ) | २,३७,३९,०६५/- |
| इ | एकूण वार्षीक ठेक्याची रक्कम दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ (अ - ड ) | ३८,०३,६०,९३५/- |

दिनांक १/१०/२००५ ते ३०/९/२००६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणूक किमान देकार रक्कम ही मा.शासन आदेश क्रमांक एमएमए - १०९४ / प्र.क्र.३ /९४ / नवि -- ३२ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ मध्ये तरतुदीच्या अनुषंगाने एकूण रक्कम रुपये ३३,११,६३,३०८/- एवढी निश्चित करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यानुसार जकात रकमेचा ठेका ४० कोट ४० लाख एवढया रकमेस मे.श्री.साई एन्टरप्रायजेस यांनी घेतला.

ठेक्याचे कालावधीतील नविन सुधारीत जकात दराची अंमलबजावणी व दुध भाजीपाल्यावरील जकात माफीवरील तुटीची रक्कम वजा जाता निव्वळ ठेक्याची रक्कम ही रक्कम रुपये ३८,०३,६०,६३५/- एवढी सहमतीच्या करारानुसार निश्चित करणेत आली.

मे.शासनाचे २८ फेब्रुवारी १९९४ चे आदेशानुसार अभिकरण योजना प्रारंभ केल्यानंतर स्विकृत रकमेत शेकडा १५ टक्क्यांने वाढ करुन पुढील वर्षासाठी किमान देकार रक्कम निश्चित करणेत यावी अशी तरतूद आहे.त्यानुसार दिनांक १/१०/२००६ ते ३१/३/२००७ या सहा महिन्याचे कालावधीसाठी खालीलप्रमाणे किमान देकार रक्कम निश्चित करावी लागेल.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रचलीत एक वर्षाची सहमतीचे करारानुसार ठेक्याची रक्कम | ३८,०३,६०,६३५/- |
| २ | वरील रकमेत शेकडा १५ % वाढ | ५,७०,५४,०९५/- |
| ३ | एकूण वार्षीक ठेक्याची किमान देकार रक्कम | ४३,७४,१४,७३०/- |
| ४ | दिनांक १/१०/२००६ ते ३१/३/२००७ अखेर ६ महिन्याकरीता किमान देकार रक्कम | २१,८७,०७,३६५/- |

जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक केल्यामुळे काही प्रमाणात शहरातील व्यापारी बंधू यांच्या तक्रारी प्राप्त होत असल्या तरी त्याकामी मनपा जकात अधिक्षक यांचे अधिपत्याखाली स्वतंत्र तक्रार निवारण कक्षाची नेमणूक करुन आलेल्या तक्रारी निकाली काढणेत येत आहेत.करारातील अटी शर्तीनुसार मा.आयुक्त ,उपायुक्त व जकात अधिक्षक यांचा निर्णय जकात अभिकर्त्यांवर बंधनकारक आहे.जकात अभिकर्त्यांने नियमातील तरतूदीचे काटेकोरपणे पालन करणे त्याचेवर बंधनकारक आहे.सबब महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे दृष्टीने जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करणे आवश्यक आहे.महानगरपालिका प्रशासनामार्फत जकात वसुली केल्यास ठेक्याचे रकमेएवढी जकात वसुली होवू शकत नाही.स्थानिक कर्मचारी स्थानिक गुन्हेगारीला आळा घालणेस असमर्थ आहेत.या सर्व बाबींचा विचार करता दिनांक १/१०/२००६ ते ३१/३/२००७ या सहा महिन्याचे कालावधीसाठी जकातीचे ठेक्याची किमान देकार रक्कम रुपये २१,८७,०७,३६५/-एवढी कायम करुन त्याप्रमाणे निविदा मागवून जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणेबाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी व उचीत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगरसचिव यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब - दि. १/१०/२००५ ते ३०/९/२००६ कालावधीतील दर नमूद केलेली ठेक्याची रक्कम रू.३८,०३,६०,९३५/- बरोबर आहे. मात्र ही रक्कम आगामी वर्षासाठी किंवा आर्थिक वर्षाच्या उर्वरीत कालावधीसाठी जशीच्या तशी विचारात घेता येणार नाही. दर कमी केल्याने ४ महिन्यासाठी परिगणीत करून वार्षिक रक्कम + दुध व भाजी पाल्याची जकात रक्कम रू. ८१,९०,०००/- एकूण देकार रक्कम य ४०,४१,००,०००/- मधून वजा करून येणारी रक्कम विचारात घ्यावी लागेल. त्याप्रमाणे परिगणित करून मु.ले.यांचे अभिप्रायासह फेरप्रस्ताव सादर करावा.

फेरसादर,

दिनांक १-१०-२००५ ते दि.३०-९-२००६ या एक वर्षाचे कालावधीसाठी जकातीची ठेक्याची रक्कम रूपये ३८,०३,६०,६३५ /- एवढी आहे.

०२. वरील रक्कम निश्चीत करतांना, ठेक्याचे कालावधीतील ४ महिन्यातील जकातीचे दर कमी केल्यामुळे होणारी तुटीची रक्कम रूपये १,५५,४९,०६५ /- एवढी विचारात घेण्यात आली आहे.

०३. सन २००६-०७ मधील ठेक्याची किमान देकार रक्कम निश्चीत करतांना १२ महिन्याचे कालावधीतील कमी केलेल्या जकात दरामुळे येणारी तुट विचारात घेणे आवश्यक आहे.

०४. दुध भाजीपाल्यावरील वार्षिक तुटीची रक्कम ही कमी करावी लागेल.

०५. वार्षिक तुट =

| | | |
|---|---|---|
| अ) जकात दर कमी केल्यामुळे येणारी तुटीची रक्कम | = | रू.४,६६,४७,१९५ /- |
| ब) दुध भाजीपाल्यावर जकात माफी दिल्यामुळे आलेली वार्षिक तुट | = | रू. ८१,९०,००० /- |
| एकुण वार्षिक तुट | = | रू. ५,४८,३७,१९५ /- |

०६. पुढील वार्षिक ठेक्याची किमान देकार निश्चिती.

| | | |
|---|---|---|
| अ) मुळ ठेक्याची रक्कम | = | रू. ४०,४१,००,००० /- |
| ब) वजा एकुण वार्षिक तुटीची रक्कम | = | रू. ५,४८,३७,१९५ /- |
| क) वार्षिक ठेक्याची रक्कम ठरविण्यासाठी विचारात घ्यावयाची रक्कम | = | रू. ३४,९२,६२,८०५ /- |

०७. २८ फेब्रुवारी १९९४ चे अध्यादेशाप्रमाणे उक्त

| | | |
|---|---|---|
| रकमेत शे.१५ % ने वाढवुन येणारी वाढीव रक्कम. | = | रू. ५,२३,८९,४२० /- |

| | | |
|---|---|---|
| ०८. एकुण वार्षिक किमान देकार रक्कम | = | रू. ४०,१६,५२,२२५ /- |
| ०९. दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ या ६ महिन्यातील किमान देकार रक्कम | = | रू. २०,०८,२६,११२-०० |

कुठलाही करार वर्षाअखेर म्हणजेच माहे मार्च अखेर संपुष्टात येणे उचित राहील. त्या दृष्टीने सन २००६-०७ या वर्षातील दि.१-१०-२००६ ते दि.३१-३-२००७ या ६ महिन्याकरीताच जकातीचा ठेका देणे योग्य राहील त्याकरीता सदर ६ महिन्याचे कालावधीसाठी ठेक्याची किमान देकार रक्कम रूपये २०,०८,२६,११२ /- एवढी कायम करून त्याप्रमाणे निविदा मागवुन जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणे बाबतचा प्रस्ताव अखेर निर्णयास व उचित आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगरसचिव यांचा फेरसादर अहवाल असे.

मुख्या लेखा परिक्षक - नगर सचिव यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे किमान देकार एकूण रू. २०,०८,२६,११२/- एवढी कायम करून दि.१/१०/२००६ ते ३१/३/२००७ अखेर निविदा मागविणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८, करानाम नियम मधील नियम क्र.३५ अन्वये स्थायी समितीच्या मान्येतेने अभिकर्ता निश्चीतीची तरतुद आहे.जाकत वसुलीसाठी उक्त प्रस्तावानुसार मान्यता देणेसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब -शासन निर्णय २८फ्रेबु.१९९४दाखवा तसेच पारगमन पासचे फि मोठी वाढ केल्याने अनुषंगीक जकात उत्पन्नत किती वाढ होणार याचा अंदाज घेवून फेर सादर करा तसेच ६महिन्यासाठी निविदा काढणे मनपाचे उत्पन्नाचे दृष्टीने आर्थिक दृष्टया लाभाचे आहे त्यास हि बाबही तपासून सविस्तर सादर करा.

उपायुक्त साहेब - जकात अधिक्षक मा.आयुक्त साहेब यांचे आदेशान्वये फेरसादर करावे.

फेरसादर ,

अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात जकात वसुली कामी महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ अन्वये जकात वसुली कामी अभिकर्ता नेमण्याची कार्यपध्दती बाबत शासन आदेश क्र. एमएमए १०९४ / प्र.क्र./०३ / ०४ नवि ३२ दि.२८ फेब्रु १९९४ ने कळविलेले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

अहमदनगर महानगरपालिका अर्थ संकल्प २००६-२००७ या कालावधी मध्ये जकातीपासुन मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे अपेक्षित धरलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | जकात | ३५,००,००,००० /- |
| २) | पारगमन फी | १४,००,००,००० /- |
| | एकुण उत्पन्न रू. | ४९,००,००,००० /- |

चालु वर्षाचा २००६-२००७ या कालावधीतील सुरूवातीचा सहा महिन्यांचा कालावधी दि.१-४-२००६ ते दि. ३०-९-२००६ हा जकात अभिकर्ता यांच्या जकात ठेक्याची कालावधी असुन

त्यांचेकडुन दि. १-१०-२००५ ते दि.३०-९-२००६ या कालावधी मध्ये जकातीचे दर कमी केल्याने तसेच भाजीपाला व दुधावरील जकात माफ करून त्या ऐवजी पारगमन फी मध्ये केलेली वाढ विचारात घेवून ठेक्याचे ४ महिन्यातील तुटीचा विचार करून मुळ देकार रक्कम रू.४०,४१,००,००० /- मधुन तुटीची रक्कम वजा जाता जकात अभिकर्ता यांचेकडुन ठेक्याची रक्कम रूपये ३८,०३,६०,६३५ /- देकार रक्कम निश्चीत केलेली आहे. त्यामुळे सन २००६-२००७ या वर्षाचे अपेक्षित केलेली रक्कम रू. ४९,००,००,००० /- पैकी उर्वरित ६ महिने म्हणजेच दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ या कालावधीसाठी रूपये २४,५०,००,००० /- एवढी अर्ध संकल्पीय तरतुद विचारात घ्यावी लागेल.

तथापी दि.१-१०-२००५ ते ३०-९-२००६ या कालावधीसाठी जकातीचा ठेका ४०,४१,००,००० /- एवढया रक्कमेस दिला गेला आहे. तसेच व्यापारी कृती समिती यांनी जकाती संदर्भात पुकारलेल्या बंद आंदोलनास सर्व व्यापारी बंधु यांनी प्रतिसाद देवुन सुमारे १७ दिवस शहरातील संपूर्ण व्यापार बंद ठेवला होता. या आंदोलनाच्या अनुषंगाने व्यापारी बंधूशी चर्चा करुन व्यापार पूर्ववत सुरु करणेबाबत शासन स्तरांवर व महापालिका स्तरावर प्रयत्न करुन व्यापार पुन्हा सुरु करण्यात आला होता. त्यावर मा.शासनाचे निर्देशानुसार जकातीचे दर कमी करणेबाबत अभ्यास समिती गठीत करुन त्यांनी सुचविलेले दर यांचा सर्वांगिण विचार करुन महानगरपालिकेच्या सभेत ठराव पारीत करुन जकातीचे दर व कर कमी केले. तसेच भाजीपाला व दुधावरील जकात माफ करुन ठेकेच्या उत्पन्नात होणारी संभाव्य घट विचारात घेवून त्यांना देकार रक्कमेमध्ये सुट दिलेली आहे. या बाबींचा विचार करुन मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

१) सन २००६-०७ मधील ठेक्याची किमान देकार रक्कम निश्चित करताना १२ महिन्याचे कालावधीतील कमी केलेल्या जकात दरांमुळे येणारी तुट विचारात घेणे आवश्यक आहे.

२) दुध भाजीपाल्यावरील वार्षीक तुटीची रक्कम ही कमी करावी लागेल.

३) वार्षीक तुट

| | |
|---|---|
| अ) जकात दर कमी केल्यामुळे येणारी तुटीची रक्कम रुपये | ४,६६,४७,१९५/- |
| ब) दुध भाजीपाल्यावर जकात माफी दिल्यामुळे आलेली वार्षीक तुट रुपये | ८१,९०,०००/- |
| एकूण वार्षीक तुट रुपये | ५,४८,३७,१९५/- |

४) पुढील वार्षीक ठेक्याची किमान देकार निश्चिती

| | |
|---|---|
| अ) मुळ ठेक्याची रक्कम रुपये | ४०,४१,००,०००/- |
| ब) वजा एकूण वार्षीक तुटीची रक्कम रुपये | ५,४८,३७,१९५/- |
| क) वार्षीक ठेक्याची रक्कम ठरविण्यासाठी विचारात घ्यावयाची रक्कम रुपये | ३४,९२,६२,८०५/- |

५) २८ फेब्रु. १९९४ चे आदेशानुसार उक्त रक्कमेत शे.१५% ने वाढवून येणारी वाढीव रक्कम. — रु. ५,२३,८९,४२०/-

६) एकूण वार्षीक किमान देकार रक्कम. — रु.४०,१६,५२,२२५/-

७) दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ या ६ महिन्यातील किमान देकार रक्कम. — रु.२०,०८,२६,११२/-

दि.१-६-२००६ पासून पारगमन फी मध्ये सहा चाकापर्यंतचे वाहनाकरीता रु.६०/- व सहा चाकापेक्षा जास्त चाकाकरीता रु.१००/- अशी फी मध्ये वाढ केल्यामुळे खालीलप्रमाणे पारगमन पासून उत्पन्न मिळू शकेल.

१) दि.१-६-२००६ ते दि.१५-७-२००६ या कालावधीतील प्रत्यक्ष उत्पन्न रुपये. — रु.१,७०,७८,४४०/-

२) प्रति दिन उत्पन्न रुपये — रु. ३,७९,५२०/-

महानगरपालिकेने जकात दर व कर कमी करताना त्यापासून होणारी तुटीची भरपाई म्हणून जकात अभिकर्ता यांना मुळ देकार रक्कमेत सुट देताना महासभा ठराव क्र.१ दि.३१-५-२००६ मध्ये पारगमन फीचे उत्पन्नाबाबत खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षीत धरले होते.

| | | |
|---|---|---|
| १) | पारगमन पास पासून प्रत्यक्ष मिळणारे सरासरी प्रतिदिन उत्पन्न रुपये | १,१०,०००/- |
| २) | पारगमन पासमध्ये वाढीव दराने होणारी उत्पन्नातील वाढ प्रति दिन रुपये | २,६८,०००/- |
| ३) | पारगमन पासून एकूण प्रति दिन अपेक्षीत उत्पन्न रुपये | ३,७९,०००/- |

वरील वस्तुस्थिती विचारात घेता ठराव क्र.१ दि.३१-५-२००६ मध्ये पारगमन पासून मिळणारे अपेक्षीत उत्पन्न रु.३,७९,०००/- व प्रत्यक्षात पारगमन पासून मिळणारे सरासरी उत्पन्न रु.३,७९,५२०/- हे जवळजवळ सारखे आलेले आहे. त्यामुळे मुळ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ या सहा महिन्याच्या कालावधीकरीता किमान देकार रक्कम रु.२०,०८,२५,११२/- अपेक्षीत धरणे उचित होईल.

दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ अखेर या ६ महिन्याचे कालावधीकरीता जकात वसुली करणेकामी ठेका देण्यासाठी निविदा काढणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे दृष्टीने आर्थिकदृष्टया लाभाचे आहे. कारण खाजगी तत्वावर असलेली यंत्रणा म्हणजे कर्मचारी, वेतन, वाहने व इतर तदनुषंगिक खर्च, संगणकीकरण, दुरध्वनी, भ्रमणध्वनी यंत्रणा या बाबींचा पूर्तता प्रशासनाकडून परीपूर्तता होउ शकत नाही. तसेच शहरात असणा-या जकात तस्करांच्या मागील अनुभव पाहता पूर्णपणे बिमोड प्रशासनाकडून होउ शकत नाही. तसेच या कामात वारंवार होणारा हस्तक्षेप व अडथळे यांना पायबंद घालता येणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत जकात वसुलीचे काम केल्यास ठेकेदाराकडून मिळणा-या अपेक्षीत रकमेच्या उत्पन्नापेक्षा कमी रक्कम मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच ठेका पध्दतीने दिल्यास अपेक्षीत उत्पन्नापेक्षा अधिक रक्कम मिळू शकते. महानगरपालिकेकडील सध्या कार्यरत कर्मचारी इतर विभागात वापरण्यात येउन नागरिकांना सुविधा देणे सोयीस्कर होईल. महानगरपालिकेमार्फत वसुली करावयाची झाल्यास जकात नाक्यासाठी लागणारे महानगरपालिकेचे कर्मचारी सुमारे २५० ते २७५ असे लागणार आहेत. ते कर्मचारी इतर विभागात वापरण्यात येतील.

तरी वरील बाबी विचारात घेता सन २००६-२००७ या वर्षातील दि.१-१०-२००६ ते ३१-३-२००७ या ६ महिन्याकरीता जकातीचा ठेका देणे योग्य राहील. व त्याकरीता सदर ६ महिन्याचे कालावधीसाठी ठेक्याची किंमत देकार रक्कम रु.२०,०८,२६,११२/- एवढी कायम करुन त्याप्रमाणे निविदा मागवून जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणेबाबत प्रस्ताव अखेर निर्णयास व उचित आदेशार्थ सादर असे.

येणे प्रमाणे सहाय्यक जकात अधिक्षक श्री डवरे एम.एल.व जकात अधिक्षक श्री निंबाळकर डी.बी.यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब - प्रत्यक्षातील उत्पन्नाची आकडेवारी व पारगमन पासाचे वाढीव दर लागू करतांना विचारात घेतलेली रक्कम समान आहे. त्यामुळे मुळ प्रस्तावानुसार देकार रक्कम निश्चीती साठी व प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब - प्रस्तावित केले प्रमाणे देकार रक्कम निश्चीत करून निविदा मागविणेत हरकत नाही. जकातीचे उत्पन्न चांगले मिळणेसाठी अभिकर्ता नेमणे अपरिहार्य आहे.

सादर,

विनंती रिपोर्ट कि,दि.१/१०/२००६ ते दि.३१/३/२००७ या सहा महिन्याकरिता जकातीचा ठेका देणे कामी दि.११/७/२००६ रोजीचे प्रस्तावानुसार उक्त सहा महिन्याच्या कालावधीसाठी ठेक्याची किमान देकार रक्कम रूपये २०,०८,२६,१२२/- (अक्षरी रूपये वीस कोट आठ लाख सव्वीस हजार एकशे बारा फक्त) एवढी कायम करून त्याप्रमाणे निविदा मागवून जकात वसुली कामी जकात वसुली कामी जकात अभिकर्ता नेमणे बाबतचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीपुढे पाठविण्यांत आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने महानगरपालिका ठराव क्रमांक २ (क) दिनांक २०/२/२००६ अन्वये अहमदनगर महानगरपालिका व अहमदनगर कँन्टोन्मेंट बोर्ड या उभय संस्थांच्या क्षेत्रात दिनांक १/४/२००६ ते ३१/३/२००७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी संयुक्त जकात कर वसुली बाबतचा करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यातील शर्त क्रमांक ४ नुसार उक्त एक वर्षाच्या कालावधी साठी अहमदनगर महानगरपालिकने कँन्टोन्मेंट बोर्डास जकात शेअर रक्कमपोटी रक्कम रूपये १ कोट अदा करणे आहे.

दिनांक ११/७/२००६ रोजीचे मूळ प्रस्तावात वरील सहा महीन्याच्या कालावधीसाठी रक्कम रूपये २०,०८,२६,११२/- एवढी किमान देकार रक्कम म्हणुन निश्चीत करण्यात आलेली आहे. दिनांक १/१०/२००६ ते ३१/३/२००७ या ठेक्याच्या कालावधीमध्ये महानगरपालिका व कँन्टोमेंट बोर्ड यांच्यामध्ये संयुक्त जकात कर वसुली बाबतचे ६ महिन्याचा कालावधी समाविष्ट झालेला असल्याने कँन्टोन्मेंट क्षेत्र हे जकात अभिकर्तास

जकात वसुलीसासाठी द्यावे लागेल. त्यानुसार सदर करार विचारात घेता ठेक्याची किमान देकार रक्कम रू.२०,०८,२६,११२/- व्यतिरीक्त आणखी ५०,००,०००/- रूपये किमान देकार रक्कमेमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

सबब मूळ प्रस्तावातील रक्कम रूपये २०,०८,२६,११२/- + वाढीव रक्कम रूपये ५०,००,०००/- अशी एकूण २०,५८,२६,११२/- एवढी किमान देकार रक्कम दि. १/१०/२००६ ते ३१/३/२००७ या सहा महिन्याच्या कालावधीसाठी कायम करणे बाबतचा पुरवणी प्रस्ताव आदेशार्थ सादर .

येणे प्रमाणे सहाय्यक जकात अधिक्षक श्री डवरे एम.एल.व जकात अधिक्षक श्री निंबाळकर डी.बी.यांचा अहवाल असे.

मुख्य लेखा परिक्षक - जकात अधिक्षक यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे दि.१/१०/२००६ ते ३१/३/२००७ अखेर कायम करून प्रस्तावीत काळा करिता निविदा मागविणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर) - उपरोक्त रू. २०,५८,२६,११२/- किमान देकार रकमेबाबतचा पुरवणी प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणे योग्य राहील. मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब - पुरवणी प्रस्तावाशी सहमत.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा .

मा श्री चव्हाण दि.ना.- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचण्यास सुरूवात केली.

मा.सभापती साहेब - ऑफिस रिपोर्ट मोठा आहे. तो वाचायचा का?

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.- नको आपण चर्चा करू शकतो.

मा श्री चव्हाण दि.ना.- ऑफिस रिपोर्ट देणारास सभेत बोलवावे.

त्या प्रमाणे सहाय्यक जकात अधिक्षक श्री डवरे एम.एल. व जकात अधिक्षक श्री निंबाळकर डी.बी.हे सभे मध्ये उपस्थित झाले.

मा श्री चव्हाण दि.ना.- जकाती विषयी किती लोकांच्या तक्रारी आल्या त्यावर काय कार्यवाही केली तक्रारी पेपर मध्येही आल्या होत्या त्या बाबत माहिती द्यावी.

जकात अधिक्षक श्री निबांळकर - एकूण ९७ तक्रारी आल्या होत्या जादा घेतलेली जकात रिफंड केली असून सर्व प्रकरणांचा निपटारा केला आहे.

मा श्री चव्हाण दि.ना.- महावीर कलेक्शनचे दुकान मालकास त्रास दिला त्याचे तक्रारीचे काय झाले.

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - त्याचे तक्रारीचे सुनावणी मा.उपायुक्त श्री लहाने साहेब यांचेकडेस झालेले असून सुनावणीचा निर्णय अद्यापी होणे आहे.

मा श्री चव्हाण दि.ना.- जकात चुकविलेल्यांना दहा पट दंड करतो अशा किती केसेस या वर्षी झाल्या.

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - अशा पांच केसेस झाल्या आहेत.

मा.श्री चव्हाण दि.ना.- त्यांची नांवे सांगावीत.

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - १. आकार कंन्स्ट्रक्शन २.व ३. तेज कुरिअर ४. प्रदिप बोकिल ५.गणेश इंडस्ट्री अशी त्यांच नांवे असून त्याचेकडून एक लाख चार हजार इतकी रक्कम वसुल केली.

मा श्री चव्हाण दि.ना.- मनपाचे वेळी अशा किती केसेस झाल्या.

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - दि.२७/८/२००५ते ३०/९/२००५ अखेर एकूण ३१ केसेस झाल्या असून पांच लाख इतकी रक्कम वसुल झाली होती.

मा श्री चव्हाण दि.ना.- मनपा असतांना एका महिन्यात पांच लाख व ठेकेदाराने दहा महीन्याचे काळात एक लाख वसुल होते हे कसे ?

मा.श्री गंधे मि.स.- ही तफावत आहे.

मा.श्री जोशी अ.सु.- मनपाचे काळात जकात वसुली कमी झाली असेल.

सहा.जकात अधिक्षक श्री डवरे - होय कमी झाली

मा.श्री जोशी अ.सु.- ठेकेदार दर महीन्याला मनपा कडेस तीन कोट रूपये भरतो आहे.

मा श्री चव्हाण दि.ना.- ठेकेदार नको असे माझे मत आहे. ठेकेदाराने दिलेले चेक वढले आहेत का?

मा.श्री जोशी अ.सु.- सहा महीन्यासाठी ठेका द्यावा जकात वसुली मनपा कर्मचारी करू शकत नाहीत.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- व्यापा-यांनी आठरा दिवस बाजार पेठ बंद ठेवली होती.

मा.सभापती साहेब - टेंडर काढण्यास मंजूरी मिळणे साठी प्रशासनाने सभे पुढे प्रस्ताव ठेवला आहे.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- व्यापा-यांना जो त्रास झाला,नाक्यावर चार चार तास गाडया थांबतात मनपाने जकात वसुली करावी नविन वर्षा पासून ठेका द्यावा ठेकेदाराने आठरा दिवसाची रक्कम दिली आहे का?

मा.सभापती साहेब - होय.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- जकात अभिकर्त्याचा व्यापा-यांना त्रास होता कामा नये ठेकेदार आठ कोटी नुकसान भरपाई मागणार आहे.

मा.सौ.वर्षा आरिफ - अशी बातमी पेपरला आली होती.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- सध्याचे ठेकेदारास ठेका द्यावा मा.आयुक्त साहेबांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.श्री जोशी अ.सु.- ऑफिस रिपोर्ट पहाता सहा महिन्यासाठी टेंडर कुणी भरणार नाही सध्याचे ठेकेदारासच ठेका द्यावा.

मा.श्री चोपडा सं.फु.- आम्ही जकातीस विरोध केला होता व्यापारा-याचे तक्रारी नुसार दर कमी केल्याने व्यापा-याची गैरसोय कमी झाली तक्रारी कमी झाल्या पूर्वी कर्मचा-याचे पगार वेळेवर होत नव्हते आता सर्व व्यवस्थीत आहे.कर्मचा-याचे पगार फरक दिलेत विरोध असूनही मनपाने जकात वसुली साठी ठेकेदारी पध्दत स्विकारली मनाने एका महिन्यात एक कोटी वीस लाख वसुली केली नविन ठेकेदार आल्यास पुन्हा तक्रारी वाढतील याचा विचार कता सध्याचे ठेकेदारास ठेका द्यावा आता जकातच रद्य होत आहे. सहा महिन्यासाठी निविदा काढू नये मार्च २००७ नतंर वर्षा साठी काढाव्यात सध्याचे ठेकेदारने परस्पर वर्तमान पत्रात जावून दाव्याची भाषा करू नये नुकसान भरपाई मागू नये असे त्याचेशी करार करतांना नमूद करावे असा ठराव करावा.

मा.श्री श्री त्रिपाठी सु.चं.- चोपडा साहेबांचमताशी सहमत आहे

मा.श्री उडाणशिवे भा.मि.- आपले मनपा कारभाराची एक परंपरा आहे भेदभाव न पाळता कारभार चालतो. ही संस्थाही चालावी व्यापारी हा शहराचे सौदर्याचा भाग आहे ते नाश होवू नये आम्हीही तक्रार केली मोर्चे काढले आता व्यापारीच म्हणतो कि हाच ठेकेदार हवा आहे. कर्मचारी जकात वसुल करतांना तक्रारी वाढतात.हा ठेकेदार योग्य असेल तर त्यालाच मुदत वाढवून ठेका द्यावा.

मा.श्री शेख मुदस्सर अ.इ.- नुकसान भरपाई मागणार नसेल व आपल्या कमेटीच्या अटी ठेकेदारास मान्य असतील तर मुदतवाढ द्यावी अन्यथा दुसरा ठेकेदार नेमावा. व्यापा-याना कमी त्रास व्हावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- ऑफिस रिपोर्ट हा निविदा काढणे बाबत आहे मा.सदस्यांचे मता प्रमाणे हयाच ठेकेदाराला ठेका द्यावा असा रिपोर्टात कुठेही उल्लेख नाही. जकात कुणी खिातून भरीत नाही ती सर्व सामान्य जनते कडूनच वसुल केली जाते. जकात ठेक्याचे चाळीस कोटीचा प्रत्येक नगरवासीयावर दरडोही ८०० ते ९०० रू. बोजा पडतो आहे. नपाचे इतिहासात जकात ठेका दिल्याचे उदाहरण नाही. मनपा वसुली साठी सक्षम आहे. असक्षम म्हणु नये ठेकेदार आपल्याला पैसे देतो तो काही उपकार करीत नाही. पेपर मध्ये त्याच्या बद्यल तक्रारी येतात. आपली संस्था स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ती बँन्क नाही. जनतेला सुविधा देण्याचे आपले धोरण आहे नफा कमवायाचे नाही. पाणी पट्टी वसुली कमी झाली तेव्हा शहराचा विकास थांबला नाही. ऑफिसने याच ठेकेदारास ठेका देण्याचा रिपोर्ट द्यावा नतंरच त्यावर निर्णय घ्यावा. असा ठेका शासन निर्णय प्रमाणे दहा टक्के रक्कम जादा घेवनू देता येणार नाही. या ठेकेदाराने नागरिकांना भरपुर त्रास दिला आहे. आपल्यावर नाही ते आरोप केलेले आहेत. कायदयाच्या विरूध्द निर्णय घेवू नका. व्यापा-यांनी १८ दिवस बंद पाळला व्यापारी जनतेच्या बाजूने आहेत. जकात नको अशी माझी भूमिका आहे. जकात नको अभिकर्ता तर मुळीच नको आठ कोटी पन्नास लाखाचे नुकसान भरपाईचा दावा करणा-यास जकात ठेका देवू नये मनपानेच जकात वसुल करावी .

मा.श्री गंधे मि.स.- आपली जकात नाकी किती आहेत.

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - एकूण २७ नाके आहेत. २२ नाके ठेकेदारास प्रथम दिली व पाच महिन्याने पाच नाके दिले.

मा.श्री गंधे मि.स.- दर दिवसास दोन लाख नुकसान भरपाई ठेकेदार मागतो त्यास जबाबदार कोण?

जकात अधिक्षक श्री निंबाळकर - एम.आय.डी.सी.शी करार झाला नव्हता त्या मुळे उशिरा नाका ठेकेदाराचे ताब्यात दिली.

मा.श्री त्रिपाठी सु.चं.- नाकी उशिरा दिली हा आरोप आपल्यावर होवू शकतो.

मा.श्री गंधे मि.स.- आजचा हा विषय महत्वाचा आहे अधिकारी सभेत उपस्थित नाहीत. जकातीचे तक्रारी संबधी जकात विभागा कडून मी माहिती घेतली त्या तक्रारीचे निवारण झालेचे दिसले. व्यापा-यांना ठेकेदारास त्रास होतो अशा केसेस जादा नाहीत. छोटी छोटी उदाहरणे आहेत. मा.स्थायी समितीने जाहीर आवाहन करावे कि त्यांचे जकाती विषयीचे तक्रारीचे कमेटी पुढे निवारण होईल. फेर निविदा मागवितांना आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे दहा टक्के रक्कम वाढवून ठेका देता येईल का ?

मा.सभापती साहेब - संविदे बाबत नियम वाचून दाखववावा

त्या प्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ नियम २ वाचून दाखविला.

मुख्य लेखा परिक्षक श्री कदम के.ए.- मनपाचे आर्थिक हिताचा विचार करून मा.स्थायी समितीस निर्णय घेता येईल सहा महिन्याचा कालावधी आहे स्थायी समितीस निर्णय घेता येईल.

मा.श्री गंधे मि.स.- सहा महीन्याचा कालावधी पहाता मनपाचे आर्थिक हित व मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्राया प्रमाणे ठेकेदाराने दिलेल्या पत्रानुसार मुदतवाढ देण्यांत यावी.

मा.श्री उडाणशिवे भा.भिम.- जकाती संबधीत तक्रारी कमी झालेल्या आहेत. आपले अधिकाराचा वापर करून सध्याचे जकात ठेकेदाराचा ठेका कंन्टीन्यु करावा.

मा.सभापती साहेब - सभे मध्ये जकात ठेक्या विषयी झालेल्या साधक बाधक चर्चे प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य श्री चव्हाण दि.ना. हे वगळता सर्वाचा सध्याचे जकात ठेकेदार त्याचे दि.१० चे पत्राप्रमाणे पुन्हा साई एन्टरप्रायजेस यांना सहा महीन्यासाठी ठेका देण्याचा कल असल्याने व आपण फक्त सहा महिने या अल्प कालवधीसाठी जकात अभिकर्ता कामी निविदा मागवणार असल्याने इतक्या अल्प कालावधीत नविन जकात अभिकर्त्यास व्यापा-यांशी समन्वय साधता येणार नाही.त्यामुळे जकात वसुली अडचणी होवून व्यापा-यांच्यात असंतोष देखील होवू शकतो. त्याप्रमाणे इतक्या कमी मुदतीसाठी जकात निविदा मागवली असल्याने कदाचित नविन जकात अभिकर्ता निविदा भरणार नाही. त्यामुळे जकात वसुली महापालिकेस करावी लागेल. परंतु महापालिका जकात अभिकर्त्या इतकी सक्षम वसुली करू शकत नसल्याने महापालिकेचा आर्थिक नुकसान होणार आहे. म्हणून मे. साई एन्टरप्रायजेस यांना पुढील सहा महिन्यासाठी जकात वसुली कामी मुदतवाढ देण्यात यावी. सदरची मुदत वाढ त्यांना देत असतांना व्यापा-यांच्या बंद काळातील व एम आय डी सी मध्ये जकात नाके नसल्याने झालेल्या नुकसानी बाबत कोणताही न्यायालयीन दावा दाखल करणार नाही किंवा त्याची नुकसान भरपाई मागणार नाही. असे लेखी लिहुन घेवून त्यांना महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जिईएन-१०९४/प्रक्र.१४३/नवि-१४ दि.३ मार्च १९९५ अन्वये १०% इतकी वाढ करून त्यांना जकात वसुली कामी मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव** - अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली साठी दिनांक १/१०/२००६ ते दि.३१/३/२००७ या सहा महिन्यातील कालावधी साठी जकात ठेक्याची किंमत देकार रक्कम रूपये २०,५८,२६,११२/- निश्चीत करतांना १५% वाढ शासन निर्णय क्रमांक एमएमए-१०९४/प्रक्र३/९४/नवि-३२ दि.२८/२/१९९४ अन्वये व अहमदनगर कॅन्टोनमेंट बोर्ड वर्गणी यांचा समावेश करून जकात अभिकर्ता नेमणे कामी जाहीर निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत कार्यालयाने सादर केलेल्या सविस्तर अहवाल व श्री साई एन्टरप्रायजेस ,जकात अभिकर्ता अहमदनगर महानगरपालिका यांचे सहा महिने मुदत वाढवून मिळणे बाबतचे मागणी पत्र व बेमुदत संप व एम आय डि सी मधील जकात नाके उशिरा हस्तांतरित केल्याने झालेल्या नुकसान भरपाई बाबतचे पत्राचे अवलोकन करून सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

आपण फक्त सहा महिने या अल्प कालावधीसाठी जकात अभिकर्ता कामी निवीदा मागवणार असल्याने इतक्या अल्प कालावधीत नविन जकात अभिकर्त्यास व्यापा-यांशी समन्वय साधता येणार नाही. त्यामुळे जकात वसुली कामी अडचणी होवून व्यापा-यांच्यात असंतोष देखील होवू शकतो. त्याचप्रमाणे कमी मुदतीसाठी जकात निवीदा मागवल्या असल्याने कदाचित नविन जकात अभिकर्ता निविदा भरणार नाही. त्यामुळे जकात वसुली महापालिकेस करावी लागेल. परंतु महापालिका जकात अभिकर्ता इतकी सक्षम वसुली करू शकत नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. म्हणून श्री साई एन्टरप्रायजेस यांना सदरची मुदतवाढ देत असतांना मुदतवाढीसाठीची खालील कारणे साकल्याने विचारात घेतली. -

१. मालेगांव ,नांदेड ,धुळे,अमरावती या महानगरपालिकांनी जकात वसुलीस

अभिकर्ता नेमणे कामी निवीदा मागवल्या होत्या. या निवीदा देकार रकमेपेक्षा कमी दराने निविदा प्राप्त झालेल्या आहेत. परंतु हि वस्तुस्थिती विचारात घेता जकात अभिकर्त्याच्या पत्रानुसार सध्या महापालिकेस देत असलेल्या जकात रक्कमेपेक्षा कमी रक्कम येत नाही. या उलट त्यांनी नैसर्गिक वाढ देणे बाबत सुचित केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जिईएन-१०९४/प्रक्र.१४३/नवि-१४ दि.३ मार्च १९९५ अन्वये १०% इतकी वाढ केल्यास महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही.

२. अहमदनगर मधील प्रतिष्ठित व्यापारी तसेच व्यापारी संघटना यांनी लेखी पत्रे देवून सध्या कार्यरत असलेल्या जकात अभिकर्त्यास मुदत वाढ देणे बाबत विनंती केली आहे. त्यापैकी प्रामुख्याने प्रतिष्ठित व्यापारी मे.कोहिनूर अहमदनगर ,मे किशोर एजन्सीज ,मे.भिंगारवाला ॲण्ड कंपनी ,मे.आर.आर.भिंगारवाला ॲण्ड सन्स,मे.एम आर भिंगारवाला ,पेट्रोलियम डिलर्स असोसिएशन अहमदनगर,मे.राम एजन्सी ,अहमदनगर प्लायवूड डिलर्स असोसिएशन इत्यादींनी पत्रे देवून जकात अभिकर्त्याशी व्यापा-यांचे सलोख्याचे संबंध असून याच जकात अभिकर्त्यास सहा महिने मुदत वाढ देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

वरील कारणांचा साकल्याने विचार करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

मे.श्री साई एन्टरप्रायजेस यांना जकात वसुली कामी पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरची मुदतवाढ त्यांना देत असतांना व्यापा-यांच्या बंद आंदोलन काळातील व एम आय डी सी मधील जकात नाके उशिरा हस्तांतरित केल्याने जकात अभिकर्त्याचे होणारे नुकसान यापोटी जकात अभिकर्ता कोणतेही नुकसान भरपाई मागणार नाही. किंवा न्यायालयात जाणार नाही असे लेखी लिहून घेवून त्यांना दि.१/१०/२००६ ते ३१/३/२००७ या कालावधीसाठी जकात अभिकर्त्याने जकातीपोटी महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक जिईएन -१०९४/प्रक्र.१४३/नवि-१४ दि.३ मार्च १९९५ मधील कलम १६ अन्वये १०% इतकी वाढ करून होणारी देयक रक्कम रू.१९,२०,९४,५४३/-(अक्षरी रू.एकोणीस कोटी विस लाख चौ-यानव्व हजार पाचशे त्रेचाळीस मात्र) अधिक अहमदनगर कॅन्टोमेंट बोर्ड यांना सहा महिन्यासाठी जकात अभिकर्त्याच्या हिस्साची देयक रक्कम रू.१५,००,०००/- मिळून एकूण देयक रक्कम रू.१९,३५,९४,५४६/- /-(अक्षरी रू.एकोणीस कोटी पस्तीस लाख चौ-यानव्व हजार पाचशे शेहचाळीस मात्र) इतकी होते. तरी सदर निश्चीत केलेल्या देयक रक्कमेस जकात अभिकर्ता श्री साई एन्टरप्रायजेस यांना दि.१/१०/२००६ ते ३१/३/२००७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

नियमानुसार करार करण्यांत यावा

सदरचे ठरावास मा.स्थायी समिती सदस्य श्री चव्हाण दि.ना. यांचा विरोध

सुचक - मा.श्री चोपडा सं.फु.

अनुमोदक - मा.श्री उडाणशिवे भा.भि.

ठराव बहुमताने मंजूर.

sdxx/-

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका.